Open Access

उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका

(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)

Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India

Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/

ISSN (Online): 2583-8423

Volume 1, Issue 4, October 2023; Pages 256 – 261

DOI: 10.5281/zenodo.10119406

Original Research Article

# गांधीजींचा धर्मविचार

प्रा. संतोष शेलार

इतिहास विभाग, के. टी. एच. एम. महाविद्यालय, नाशिक ४२२००२ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: santoshshilahar@gmail.com

Received: 17 October, 2023 | Accepted: 26 October, 2023 | Published: 27 October, 2023

महात्मा गांधी हे भारतीय स्वातंत्र्य लढ्याचे नेते होते. या व्यतिरिक्तही त्यांच्या जीवनाला विविध पैलू होते. ते एक समाजसुधारक नि मूलगामी विचारवंत होते. त्यांनी जीवनाच्या विविध क्षेत्रावर भाष्य केले आहे. त्यातील एक महत्त्वाचे क्षेत्र म्हणजे धर्म. गांधीजी केवळ राष्ट्रपुरुषच नाही तर धर्मपुरुष पण मानले जातात ते त्यांच्या या क्षेत्रातील कार्यामुळे.

गांधीजींचा जन्म एका वैष्णव कुटुंबात झाला.[१] आपल्या धर्मजीवनाची सुरुवात कशी झाली ते त्यांनी आपल्या आत्मकथेत सांगितले आहे. त्यात ते म्हणतात, “सहाव्या-सातव्या वर्षापासून तो सोळा वर्षाचा होईपर्यंत मी अभ्यास केला: परंतु शाळेत कोठेही धर्माचे शिक्षण मिळाले नाही. शिक्षकांपासून सहजी मिळायचे तेही मिळाले नाही असे म्हणता येईल. तरी पण वातावरणातून काही ना काही मिळतच गेले. येथे धर्माचा व्यापक अर्थ घेतला पाहिजे. धर्म म्हणजे आत्मभान आत्मज्ञान.” याच काळात त्यांनी वाचनाला सुरुवात केली. त्यातही रामायणाचा प्रभाव त्यांच्यावर विशेष पडला. याविषयी ते म्हणतात, “पण माझ्या मनावर सर्वात जास्त परिणाम जर कशाचा झाला असेल तर तो रामायणाचा. रामायणाबद्दल मला वाटणारा आत्यंतिक प्रेमाचा पाया हे रामायणश्रवण होय. तुळशीदासाचे रामायण हा मी आज भक्तीमार्गावरील सर्वोत्तम ग्रंथ मानतो.”[२] याच काळात त्यांचा विविध संप्रदायांशी संपर्क आला. त्यातून त्यांची दृष्टी व्यापक झाली. ते म्हणतात, “राजकोटमध्ये मला अनायासेच सर्व संप्रदायाविषयी समभाव राखण्याचे शिक्षण मिळाले. हिंदुधर्माच्या प्रत्येक संप्रदायाबद्दल समभाव शिकलो. कारण की आईबाप हवेलीला जात, शिवालयात जात आणि राममंदिरात जात. आणि आम्हा भावांना घेऊन जात, किंवा पाठवीत असत. शिवाय, वडिलांपाशी जैनधर्माचार्यामधून कोणी ना कोणी नेहमी येत. वडील त्यांना भिक्षाही घालीत. ते वडिलांबरोबर धर्मासंबंधी व व्यवहारासंबंधी गोष्टी करीत. याशिवाय वडिलांचे मुसलमान आणि पारशी मित्रही होते. ते आपापल्या धर्माबद्दल गोष्टी बोलत, आणि वडील त्यांचे म्हणणे आदरपूर्वक व पुष्कळ वेळा रसपूर्वक ऐकत असत. अशा प्रकारच्या वार्तालापांच्या वेळी मी 'नर्स' असल्यामुळे बरेचदा हजर असे. या सर्व वातावरणाचा माझ्यावर असा परिणाम झाला की सर्व धर्माबद्दल माझ्य मनामध्ये समानभाव उत्पन्न झाला.”[३]

विलायातेस गेल्यावर त्यांनी गीता वाचली आणि त्या ग्रंथाचा विलक्षण प्रभाव त्यांच्या मनावर पडला. ते म्हणतात, “भगवद्गीता अमूल्य ग्रंथ आहे अशी माझी त्या वेळी समजूत झाली. ती समजूत हळूहळू दृढ होत गेली व आज तत्त्वज्ञानाच्या बाबतीत मी तिला सर्वोच्च ग्रंथ समजतो.”[४] गीतेचा प्रभाव त्यांच्या मनावर आजीवन राहिला. नंतरच्या काळात त्यांनी गीतेवर भाष्य देखील लिहिले.

पुढील काळात त्यांनी ख्रिस्ती आणि मुस्लीम धर्माचा पण अभ्यास केलेला दिसतो.[५] त्यातून त्यांची धर्म जिज्ञासा अधिकच जागृत झाली. ते म्हणतात, “ख्रिश्चन मित्रांनी माझी धर्मजिज्ञासा फार तीव्र करून सोडली, ती काही केल्या शांत होण्यासारखी नव्हती.”[६]

एका अर्थाने गांधीजींचे सारे भावजीवन धर्म विचारांनी व्यापले होते. त्यांनी आयुष्यभर जी काही राजकीय व सामाजिक कार्य केले त्याचे अधिष्ठान पण मुळात धर्म नि विशेषतः अध्यात्म होते. त्यांनी एके ठिकाणी असे म्हटले आहे, “अशा तऱ्हेने मी जो समाजाच्या सेवेमध्ये तन्मय होऊन गेलो, त्याचे कारण आत्मदर्शनाची अभिलाषा हेच होते. ईश्वराची ओळख सेवेनेच होईल असे समजून मी सेवाधर्माचा स्वीकार केला.”[७]

त्यांच्या धर्म जीवनातील काही महत्त्वाच्या संकल्पनांची चर्चा काही मुद्द्यांच्या आधारे इथे करीत आहे.

**ग्रंथप्रामाण्य**

गांधीजी स्वत:ला सनातनी हिंदू म्हणवीत हे प्रसिद्ध आहे. त्या विषयी स्पष्टीकरण देताना त्यांनी असे म्हटले आहे, “मी वेद, उपनिषदे, पुराणादि जे हिंदू धर्मग्रंथ म्हणून मानले जातात ते सर्व मानतो.”[८] धार्मिक ग्रंथांविषयी पुढे ते म्हणतात, “वेदांविषयीं किंवा इतर धर्मग्रंथांविषयीं उल्लेख करतांना मी त्यांच्या - संबंधीं अपौरुषेय हा शब्द मुद्दामच उपयोगांत आणलेला नाहीं हें वाचकांनी लक्षांत घ्यावें. कारण वेद हेच तेवढे दैवी आहेत असें मी मानीत नाहीं. बायबल, कुराण आणि झेंद अवेस्ता हे वेदाइतकेच दैवी प्रतिभेतून जन्माला आले आहेत असें मी मानतो. हिंदु धर्मग्रंथ मी मानतों म्हणून कांहीं त्यांतला प्रत्येक शब्द आणि प्रत्येक श्लोक ईश्वराकडून स्फुरलेला आहे असें मानण्याची मला आवश्यकता वाटत नाहीं. मनाला थक्क करणाऱ्या या ग्रंथांचे मला प्रत्यक्ष ज्ञान आहे असेंहि मी म्हणत नाहीं. परंतु एवढे मात्र मी जरूर म्हणतों कीं या धर्मग्रंथांच्या मूळ शिकवणीतील सत्यें मी जाणतों आणि अनुभवतों. त्यावरील कोणतेंहि भाष्य, तें किती जरी विद्वत्तापूर्ण असले तरी, जर तें बुद्धीला किंवा नीतिभावनेला न पटणारें असेल तर, त्याने बांधलें जाण्याचा मी इन्कार करतो. हिंदु धर्मग्रंथांचा बरोबर अर्थ आजचे शंकराचार्य आणि शास्त्रीच देतात असा जर त्यांचा दावा असेल तर तो मला सर्वस्वी नाकबूल आहे. उलट, या ग्रंथांविषयींच्या आमच्या आजच्या ज्ञानाची अवस्था अत्यंत गोंधळाची आहे असें माझें मत आहे. सत्य-अहिंसा-ब्रह्मचर्य याबाबतीत ज्यांनी पूर्णत्व संपादलेले नाही आणि ज्यांनी संपत्ती-संपादनाचा किंवा संग्रहाचा सर्वस्वी त्याग केलेला नाही अशा कोणालाही शास्त्रांचे खरे ज्ञान नसते, या हिंदू सूक्तीवर माझा पूर्ण विश्वास आहे.”[९] इथे गांधीजींची धर्मग्रंथ विषयक भूमिका पूर्णपणे स्पष्ट झाली आहे. असे दिसते की ते हिंदू धर्मग्रंथ मानतात, धर्मग्रंथ दैवी स्फुरणातून आलेले असतात, असेही त्यांना वाटते पण त्यांचे शब्दशः प्रामाण्य त्यांना अमान्य आहे. तसेच अन्य धर्मातील धर्मग्रंथ देखील दैवीच आहेत असे त्यांचे मत दिसते. मात्र त्यांना शब्दशः प्रामाण्य न मानण्याचा व आपल्या सदसदविवेकबुद्धीनुसार अर्थ काढण्याचा हक्क त्यांनी राखीव ठेवला आहे. त्यांच्या दृष्टीने शास्त्रांचे सार जाणण्याची कसोटी ही सत्य-अहिंसा-ब्रह्मचर्य आहे. एका अर्थाने गांधीजी सत्य-अहिंसा-ब्रह्मचर्य ही त्रयी शास्त्रापेक्षा वरचढ मानतात.

**सत्य**

गांधीजींच्या जीवनात ‘सत्य’ या संकल्पनेला विलक्षण महत्त्व होते. इथे सत्य हे केवळ सत्य बोलण्यापुरते मर्यादित नाही. ते अधिक व्यापक अर्थाने तो शब्द वापरतात. ते म्हणतात, “सत्य या शब्दांशी जुळणारा दुसरा शब्द ' सत्' हा आहे. सत् म्हणजे असणें. ईश्वर हाच एकमेव सत् आहे. तोच एक आहे; दुसरें कांहींहि किंवा कोणीहि नाहीं. बाकीचें सर्व माया आहे. सत्य म्हणजे सत्. सत्य हेंच एक जगांत आहे, इतर कांहींच नाहीं. हें समजायला अगदीं सोपें आहे. तर मग सत्य म्हणजे काय? आमच्या बाबतींत तो सापेक्ष शब्द आहे. निरपेक्ष किंवा पूर्ण सत्य म्हणजे ईश्वर. ईश्वर या शब्दानें जें जें कांहीं आपल्या लक्षांत येतें तें सत्यांत अभिप्रेत आहे.”[१०] अन्यत्र एके ठिकाणी ते म्हणतात, “सामान्यतः सत्य बोलणें म्हणजे सत्य एवढेंच समजलें जातें. पण 'सत्य' शब्द आपण विशाल अर्थी वापरला आहे. विचारांत, वाणींत आणि आचारात सत्य तेच सत्य. हे सत्य संपूर्णतः ज्याला समजलें त्याला जगांत दुसरें कांहीं जाणावयाचे राहात नाही. कारण सर्व ज्ञान त्यांत सांठलेलें आहे. त्यांत जे नाही ते सत्य नव्हे, ज्ञान नव्हे; मग त्यांत खरा आनंद असणारच कोठून ? ही कसोटी वापरायला जर आपण शिकलों तर कोणतें कर्म करणें योग्य, कोणतें त्याज्य, काय पाहणें योग्य काय अयोग्य, काय वाचणें योग्य काय अयोग्य हें आपल्याला लगेच कळून येईल.”[११] इथे सत्य ही संकल्पना गांधीजी विविध अर्थाने वापरतात असे दिसते. सत्य हा शब्द ते ईश्वर, सदसदविवेकबुद्धी, नीति, चित्तशुद्धी अशा अर्थाने वापरतात. या शब्दाचा अर्थ त्या त्या वेळच्या संदर्भानुसार घ्यावा लागतो. त्यांच्या दृष्टीने सत्य हे ईश्वर पण आहे आणि ईश्वराकडे जाणारा मार्ग पण आहे.

**अहिंसा**

सत्याबरोबरच ते अहिंसा ही संकल्पना महत्त्वाची मानतात हे सर्वप्रसिद्ध आहे. जगात प्रचंड प्रमाणात हिंसा होत असते अशा वेळी अहिंसा व्रत पाळणे किती कठीण आहे व त्याच्या मर्यादा काय असू शकतात याची गांधीजींना जाणीव आहे. ते म्हणतात, “अहिंसा ही व्यापक वस्तु आहे. हिंसेच्या वणव्यांत सांपडलेले आपण पामर जीव आहोत. 'जीव जीवाचें जीवन आहे.' हें खोटें वाक्य नाहीं. मनुष्य एक क्षणसुद्धां बाह्य हिंसेवांचून जगू शकत नाहीं. खातांपिता, उठतां बसतां, सर्व क्रिया करतांना इच्छेअनिच्छेनें कांहींना कांहीं हिंसा तो करीतच राहतों. अशा हिंसेंतून बाहेर पडण्याचे त्याचे महाप्रयत्न असतील, त्याच्या अंतःकरणांत निव्वळ अनुकंपा असेल, अत्यंत सूक्ष्म जंतूचा सुद्धा नाश तो इच्छित नसेल व यथाशक्ति त्यांना वाचविण्याचा जर त्याचा प्रयत्न असेल, तर तो अहिंसेचा भक्त आहे. त्याच्या हालचालींत निरंतर संयम वाढत जाईल, त्याच्यांत निरंतर करुणा वाढत जाईल. पण कोणीहि देहधारी बाह्य हिसेंतून सर्वथा मुक्त होऊ शकणार नाहीं.”[१२] इथे अहिंसेचा अर्थ केवळ हिंसा न करणे एवढाच व नकारात्मक नाही. त्याची सकारात्मक व क्रियाशील बाजू सांगताना गांधीजी म्हणतात, “भावात्मक (Positive) स्वरूपांत अहिंसेचा अर्थ विश्वव्यापी प्रेम आणि अमर्याद औदार्य असा होतो. मी जर अहिंसेचा उपासक असेन तर मी माझ्या शत्रूवर प्रेम केलें पाहिजे. जो नियम मी अन्याय करणाऱ्या माझ्या बापाला किंवा मुलाला लावीन तोच इतर अन्याय करणाऱ्याला मी लावला पाहिजे, मग तो माझा शत्रु असो कीं अपरिचित मनुष्य असो. या क्रियाशील (active) अहिंसेंत सत्याचा आणि निर्भयतेचा अवश्यमेव समावेश होतो.”[१३] गांधीजींच्या अहिंसेत प्रेम आणि औदार्य यांना महत्त्व आहे. कोणी घाबरून अहिंसा पाळत असेल तर गांधीजींना ते मान्य नाही अशी भ्याड अहिंसा पाळण्यापेक्षा हिंसा त्यांना जास्त योग्य वाटते. ते म्हणतात की, “भित्रेपणा आणि हिंसा अशी निवड करण्याची वेळ आली तर मी हिंसा निवडेन.”[१४]

हिंसेचा आणखी वेगळ्या दृष्टीने सुद्धा त्यांनी विचार केला आहे. आपल्या गीता भाष्यात ते म्हणतात, “जो माणूस स्वेच्छेने कर्माचा त्याग करतो तो ‘मी' आणि 'माझे' यापासून मुक्त होतो. मग तो केवळ त्यागाच्या किंवा इतरांचं भलं करण्याच्या भावनेतून काम करायला लागतो. या भावनेने केलेलं काम म्हणजे अहिंसा. मात्र त्यासाठी दोन अटी पूर्ण करायला हव्यात. एक म्हणजे त्या कामात आपला कोणताही स्वार्थी हेतू असू नये. दुसरी अट म्हणजे ते काम स्वत:च्या हितासाठी केलेलं असू नये, उलट ते काम इतरांच्या, सर्व जगाच्या भल्यासाठी केलेलं असलं पाहिजे, या दोन अटींचं पालन झालं तर मग केलेलं अत्यंत वाईट आणि क्रूर कृत्यही 'अहिंसा' म्हणूनच गणले जाईल.”[१५] इथे अहिंसेचा अर्थ काही प्रमाणात वेगळा लावला आहे. इथे ‘मी’, ‘माझे’पासून मुक्ती आणि पराहितार्थ केलेलं कर्म हे दोन निकष महत्त्वाचे मानले आहेत आणि अशा वेळी झालेली हिंसा पण त्यांना हिंसा न वाटता अहिंसा वाटते.

**ब्रह्मचर्य**

या संकल्पनेचा काय अर्थ आहे तो आपण गांधींच्या शब्दांत पाहू. ते म्हणतात, “केवळ पाशवी वासनांवर नियंत्रण मिळवले की ब्रह्मचर्याचे प्रालंन झाले, असे समजले जाते. माझ्या मते ही धारणा अपूर्ण आणि चुकीची आहे. ब्रह्मचर्य म्हणजे सर्व इंद्रियांचा निग्रह. जी व्यक्ती केवळ एका इंद्रियाचा निग्रह करते आणि इतर इंद्रियांना मोकळे रान सोडते त्या व्यक्तीला आपले प्रयत्न वाया गेल्याचा अनुभव येणे अपरिहार्य आहे. .... त्यामुळे ज्याला एका इंद्रियावर नियंत्रण आणायची इच्छा असेल त्याने उरलेल्या सर्व इंद्रियांना नियंत्रित केले पाहिजे. .... ब्रह्मचर्याच्या संकुचित व्याख्येमुळे बरेच नुकसान झाले आहे असे मला नेहमीच वाटत आले आहे. आपण जर एकाच वेळी सर्व बाजूंनी संयमाचा प्रयत्न केला तर तो प्रयत्न शास्त्रशुद्ध होईल आणि तो यशस्वी होण्याची शक्यता राहील.”[१६] गांधीजी इथे ब्रह्मचर्य या संकल्पनेचा अधिक व्यापक अर्थ लावताना दिसतात. सर्वच इंद्रियांचा संयम त्यांना अभिप्रेत आहे. अर्थात सामान्य माणासाला हा संयम शक्य नाही हे गांधीजी मान्य करतात. ते म्हणतात, “आजीव ब्रह्मचर्यपालन हे मनापासून इच्छिण्याजोगे आहे खरे परंतु ज्याला आपले विकार आवरता येत नाहीत ज्याचे मन आणि इंद्रिये शरीर लालसा धरतात त्याने गृहस्थाश्रमात शिरले पाहिजे आणि शुद्ध गृहस्थ जीवन घालविले पाहिजे. त्याच्या बाबतीत राजीव ब्रह्मचर्याचा प्रयत्न वृथा आहे.”[१७] विवाहित स्त्री पुरुषांनीही ब्रह्मचर्य पाळल्यास अधिक चांगले असा अभिप्राय त्यांनी दिला आहे.[१८] इथे एक गोष्ट स्पष्ट दिसते की गांधीजींची कामभावनेकडे पहाण्याची दृष्टी आधुनिक नि निरोगी नाही.

**वर्णधर्म**

गांधीजींनी आपल्या साहित्यात वर्णव्यवस्थेचे समर्थन केले आहे. अर्थात प्रचलित जातीव्यवस्था त्यांनी अमान्य केलेली आहे आणि अस्पृश्यतेचे तर ते सक्रीय विरोधक होते. ते म्हणतात, “वर्ण म्हणजे माणसाच्या धंद्याच्या निवडीचा पूर्व निर्णय. मनुष्यानें आपली उपजीविका करण्याकरितां वाडवडिलांचाच धंदा करावा याचें नांव वर्णधर्म. प्रत्येक मूल स्वाभाविकपणें बापाचा वर्ण (रंग) घेतें, किंवा बापाचा धंदा करणें पसंत करतें. म्हणून वर्ण हा एक प्रकारें वंशपरंपरेने येणाऱ्या वारसाचा नियम आहे. वर्ण ही हिंदूंच्यावर कोणी वरून लादलेली गोष्ट नाहीं. हिंदुसमाजाचें श्रेय सांभाळण्याचें काम ज्या पुरुषांच्या माथ्यावर होतें त्यांनीं त्याकरितां शोधून काढलेला हा नियम आहे. हा नियम मानवकृत नाहीं, तर निसर्गकृत तो अढळ नियम आहे. न्यूटनच्या गुरुत्वाकर्षणाच्या नियमाप्रमाणें जी शक्ति सदोदित अस्तित्वांत आहे.”[१९] जातीव्यवस्थेविषयी पुढे ते म्हणतात, “वर्णांचा जातीशी काही संबंध नाही, जात ही अस्पृश्यतेप्रमाणे हिंदू धर्मावर माजलेले बांडगुळ आहे.”[२०] ज्ञानप्राप्तीच्या अधिकाराबाबत गांधीजी अशी भूमिका घेतात की ज्ञानप्राप्तीचा अधिकार सर्वांनाच असला पाहिजे. व्यवसायबंदीचे मात्र ते समर्थन करतात. ते म्हणतात, “शूद्राला ज्ञानप्राप्तीचा अधिकार ब्राह्मणाइतकाच आहे पण जर तो आपला चरितार्थ अध्यापनाच्या द्वारा प्राप्त करण्याचा प्रयत्न करील तर तो वर्णधर्मापासून च्यूत होईलच.”[२१] असे दिसते की गांधीजींच्या मनातली आदर्श वर्णव्यवस्था प्रचलित जातीव्यवस्थेपेक्षा

बरीच निराळी आहे. त्यात व्यवसायाचा अधिकार सोडल्यास सर्व अधिकार सर्व वर्णांना आहेत. सर्वांचा मानही समानच आहे. व्यवसाय मात्र वाडवडिलांचाच करावा, असा गांधीजींचा अभिप्राय आहे. त्या काळाच्या मानाने गांधीजींचा विचार प्रागतिक असला तरी आज तो विचार काही प्रमाणात मागास ठरतो कारण त्यात व्यक्तीचे स्वातंत्र्य नाकारले जाते.

**समारोप**

या लेखात आपण गांधीजींच्या धर्म विचारातील काही महत्त्वाच्या संकल्पना पाहिल्या. यातून एक गोष्ट लक्षात येते की गांधीजींचा धर्मविचार हा मुख्यत: आपल्या भारतीय परंपरेतून आलेला आहे. त्यातील जो उन्नत भाग आहे तोही परंपरेतूनच आलेला आहे आणि त्यांच्या विचारांचे दोषही परंपरेतूनच आलेले आहेत. इथे एक महत्त्वाची गोष्ट अशी की त्यांनी कोणतीही गोष्ट धर्मग्रंथ वा परंपरा म्हणतात म्हणून स्वीकारली नाही. त्यातील जी गोष्ट आपल्या सदसदविवेकबुद्धीला पटेल तीच गोष्ट त्यांनी स्वीकारली. त्या स्वीकारत असताना त्यांनी त्यात त्यांना योग्य वाटतील ते बदल केले. प्रत्येक विचार हा कृतीत आला पाहिजे, त्यावर प्रयोग झाले पाहिजेत असा आग्रह त्यांनी धरला. त्यांच्या या वृत्तीमुळेच ते भारतीय धर्मपरंपरेला मौलिक योगदान देऊ शकले. म्हणूनच ते केवळ राजकीय नेते व समाजसुधारक न ठरता धर्मपुरुष पण ठरले.

**संदर्भ सूची**


१. गांधी मोहनदास करमचंद, *सत्याचे प्रयोग अथवा आत्मकथा,* अनुवादक – सीताराम पुरुषोत्तम पटवर्धन, नवजीवन प्रकाशन मंदिर, अहमदाबाद, १९९९, पृ. २९

२. कित्ता, पृ. ३०

३. कित्ता, पृ. ३१

४. कित्ता, पृ. ६५

५. कित्ता, पृ. १३१, १३२

६. कित्ता, पृ. १५१

७. कित्ता

८. भाऊ धर्माधिकारी (संपादक), *गांधी विचार दर्शन – धर्मविचार भाग -२*, महाराष्ट्र गांधी स्मारक निधी प्रकाशन, पुणे, १९९४, पृ. ६. (इथून पुढे या ग्रंथाचा उल्लेख ‘धर्मविचार भाग- २’ असा केला जाईल.)

९. कित्ता, पृ. ७.

१०. भाऊ धर्माधिकारी (संपादक), *गांधी विचार दर्शन – धर्मविचार भाग -१*, महाराष्ट्र गांधी स्मारक निधी प्रकाशन, पुणे, १९९४, पृ. १०६ (इथून पुढे या ग्रंथाचा उल्लेख ‘धर्मविचार भाग- १’ असा केला जाईल.)

११. कित्ता पृ. १०८

१२. कित्ता पृ. ११८

१३. कित्ता पृ. १५४

१४. गोखले द. न., *गांधीजी मानव नि महामानव*, मौज प्रकाशन, मुंबई, २००८, पृ. १४६

१५. गांधी मोहनदास करमचंद, *भगवद्गीता गांधीजींच्या चिंतनातून*, अनुवाद – भगवान दातार, रोहन प्रकाशन, पुणे, २०१९, पृ. २६५

१६. प्रभू आर. के. आणि राव यु. आर. (संपादक), अनुवाद – ब्रिजमोहन हेडा, *महात्मा गांधीजींचे विचार*, नवजीवन प्रकाशन मंदिर, अहमदाबाद, २०१५, पृ. ३००, ३०१

१७. *धर्मविचार भाग-* २, पृ. ५८

१८. कित्ता

१९. कित्ता पृ. ३०

२०. कित्ता

२१. कित्ता पृ. ३१, ३२